# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २६/०४/२०२६ (रविवार)

## ६१४ ग्रॅम गांजा सह ८८ हजार ३० रूपयांचा मुद्देमाल जप्त, आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, नागपूर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :–** दिनांक २५/०४/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक हे पथक सावनेर उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने अंमली पदार्थ गांजा बाबत खात्रीशिर माहीती दिली. नमुद पथकाने कारवाई करत पेट्रोलींग केली असता पेट्रोलींग दरम्यान गोंडखैरी बसस्थानकाचे जवळील तथागत भोजनालय/साहील टायर वर्क समोर **आरोपी नामे सुरज राजकुमार मेश्राम, वय ३४ वर्ष, रा. फुकट नगर गोंडखैरी, तह कलमेश्वर, जि. नागपुर** हा होंडा कंपनीची स्प्लेंडर प्लस मोटरसायकल क्र. एम एच–४०/सि.डब्लयु– ६६४४ वर हातात कापडी पिशवी घेवुन संशयास्पदरीत्या थांबुन दिसुन आला. आरोपी शासकिय वाहन पाहुन संशयास्पदरित्या पळुन जावु लागल्याने पोलीसांचा संशय अधिक बळावल्याने आरोपीस ताब्यात घेतले. पोलीसांनी पंचासमक्ष त्याची आणि त्याचेकडील कापडी पिशवीची झडती घेतली अंमली पदार्थ गांजा मिळुन आला.

**नमुद आरोपीच्या ताब्यातुन अंमली पदार्थ गांजा ६१४ ग्रॅम किंमती १२,२८०/–रुपये , ०१ मोबाईल व रोख रक्कम ७५०/–रूपये,** होंडा कंपनीची स्प्लेंडर प्लस मोटरसायकल क्र. एम एच–४०/सि.डब्लयु– ६६४४ किंमती ६०,०००/–रूपये **असा एकुण ८८०३०/– रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

**नमुद प्रकरणी आरोपीविरूद्ध पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम ८(क), २० (ब) (ii) (अ), २९ एन.डि.पि. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**


ORBIT
पोलीस स्टेशन कळमेश्वर
ऑर्बिट
पोलीस स्टेशन कळमेश्वर नागपूर (ग्रा.)

# जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद
# ०५ गोवंश जनावरांची सुटका,

**पोलीस स्टेशन मौदा** :– दिनांक २५/०४/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, भंडारा येथुन नागपूरच्या दिशेने अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी माथनी टोल नाका येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान बोलेरो पिकअप क्र. एम एच–३६/ए ए–३६७९ मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता चालक नामे अमोल मधुकर काळे, वय ३३ वर्ष, रा. लापेश्वर, ता. जि. भंडारा हा मिळुन आला. पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०५ गोवंश (०२ बैल, ०३ गोरे) जनावरे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन, चारा पाण्याची व्यवस्था न करता वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून बोलेरो पिकअप क्र. एम एच–३६/ए ए–३६७९ किंमती ५,००,०००/–रूपये आणि ५ गोवंश जनावरे किंमती ६०,०००/–रूपये असा एकुण ५,६०,०००/– रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

नमुद प्रकरणी आरोपी चालक नामे अमोल मधुकर काळे, वय ३३ वर्ष, रा. लापेश्वर, ता. जि. भंडारा याचेंविरूद्ध कलम ११(१) (ह) (ई) प्राण्यांना कृरतेने वागविण्यास प्रतिबंध अधि. १९६० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०८ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. ०८ मोबाईलसह एकुण ०३ लाख ५६ हजार १६० रूपयांचा मुद्देमाल जप्त,

**पोलीस स्टेशन रामटेक** :– दिनांक २५/०४/२०२६ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, काविश लुलाणी, रा. शास्त्री वार्ड, रामटेक हा आपल्या घरी तिसऱ्या माळयावर काही लोकांसोबत ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे रामटेक पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) राजेश सुरेश येनुरकर, वय २५ वर्ष, रा. शिवाजी वार्ड, रामटेक २) काविश अब्दुल लुलाणी, वय २७ वर्ष, रा. वर्धमान नगर, नागपुर ह. मु.शास्त्री वार्ड, रामटेक ३) संजय सुदरलाल बिसमोगरे, वय ४७ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड, रामटेक ४) आलोक मुलचंद मानकर, वय ३२ वर्ष, रा. राधाकृष्ण वार्ड, रामटेक ५) पंकज रमेश वाघमारे, वय ४० वर्ष, रा. शितलवाडी रामटेक ६) रवि गणपत गिरीपुजे, वय ४५ वर्ष, रा. शितलवाडी रामटेक ७) तरूण विकास जैन, वय ४० वर्ष, रा.शास्त्री वार्ड, रामटेक ८) विक्की रमेश कोठारी, वय ४० वर्ष, रा. गांधी वार्ड, रामटेक** यांना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून **५२ तास पत्ते आणि** रोख रक्कम ६६,१६०/–रूपये ०८ वेगवेगळया कंपनीचे मोबाईल किंमती २,९०,०००/–रूपये असा एकुण ३,५६,१६०/– रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०८ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०९ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

दिनांक २५/०४/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणारे आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन देवलापार** अंतर्गत देवलापार पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी मोहम्मद याकुब सकिल, वय ४१ वर्ष, रा. नुरी मज्जीत जवळ नारा नारी रोड, उपलवाडी नागपुर हा मौजा डोगरताल दर्गा कडबीखेडा शिवार येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. तसेच **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** अंतर्गत मौजा रामदास पुंड यांच्या दारू दुकानाच्या समोरील शेतात जाणारा पांदन रोड येथे **आरोपी देवेन्द्र सुर्यभाथ राजभर, वय ३८ वर्ष, रा. ग्राम बुधवा पोस्ट भेलाई, तह. थाना रसळा, जिल्हा बलीया, उत्तर प्रदेश ह.मु डॉ. बिस्वास यांच्या घरी कियाने, ता. हिंगणा जिल्हा नागपुर** हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत मौजा बोर्डा टोल नाका, मौजा शिवनगर कांद्री कन्हान येथे कन्हान पोलीस पेट्रोलींग करीत असतांना **आरोपी १) सौरभ पंजाबराव वासे, वय २७ वर्ष, रा. रामनगर कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपुर २) हर्षल रामचंद्र गायधने, वय २५ वर्ष, रा. वार्ड नं ०१, इंदिरानगर कांद्री कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपुर हे सार्वजनिक ठिकाणी** अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. पोलीस स्टेशन वडोदा अंतर्गत सावळी फाटा येथे वडोदा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी १) निरंजन गुरूदेव यादव, वय २३ वर्ष, रा. ह. मु. हल्दीराम हाउसिंग गुमथळा, ता. कामठी जि. नागपूर २) कमल राजेश शाहू, वय २१ वर्ष, रा. ह.मु. हल्दीराम हाउसिंग गुमथळा, ता. कामठी जि. नागपूर हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन पारशिवनी** अंतर्गत पारशिवनी पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी राहूल कमल तोमर, वय २१ वर्ष, रा. बड्डी, घोगरा रोड, ता. पारशिवनी, जि. नागपूर हा करभांड शिवार पारशिवनी ते करभांड गावाकडे जाणारे रोडवरील बानसींगी नाल्याचे पूलीयाचे जवळ सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन रामटेक** अंतर्गत स्मशानभूमी मनसर, माउली रोडवरील पुलीया जवळ मनसर येथे रामटेक पोलीस पेट्रोलींग करीत असतांना **आरोपी १) कालु टिकम सोलंकी, वय ३९ वर्ष, रा. आकोली, ता. सेलु, जि. वर्धा, ह. मु मनसर, ता. रामटेक २) लखन देवा सोलंकी, वय ३५ वर्ष, रा. पचधर, पो. कचारी सावंगा, ता. काटोल, जि. नागपुर, ह.मु मनसर, त. रामटेक हे सार्वजनिक ठिकाणी** अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. नमुद आरोपींवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये ०९ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २३ गुन्हे नोंद

दिनांक २५/०४/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण १०९७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण २३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे १) नवसू गोपाला महाजन, वय ३४ वर्ष, रा. वार्ड क्र. ०२, धवलपेठ ता. जि. नागपूर २) नविनकुमार विश्वनाथ प्रसादरांय, वय ४२ वर्ष, रा. लावापूर, ता. महनार, जि. वैशाली, राज्य बिहार, ह.मू. बोरखेडी रेल्वे, ता. जि. नागपूर याचेवर प्रत्येकी १ असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे १) अक्षय लक्ष्मणजी पुनवटकर, वय ४० वर्षे, रा. वार्ड नं ०४, बेला ता. उमरेड, जि. नागपुर २) प्रमोद विश्वनाथ तराळे, वय ४६ वर्षे, रा. बेला, ता. उमरेड, जि. नागपुर ३) इंद्रकुमार चंद्रकार, वय ३३ वर्षे, रा. बोरीदार मुनगासेर, महासमुंद झत्तीसगढ, ह.मु. खालसा याचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे श्रावण शेषराव सायरे, वय ४२ वर्ष, रा. खानगाव यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी १) मिलींद हरिभाउ गिरी, वय २७ वर्ष रा. मेंढला, ता. नरखेड २) संजय चंद्रभान वाढबुध्दे, वय ४३ वर्ष, रा. जलालखेडा, ता. नरखेड ३) शिव रामसिंग नाहनिया, वय २२ वर्ष, रा. परसोडी, ता. नरखेड ४) रामशंकर श्रीराम सुर्यवंशी, वय ३२ वर्ष, रा. नारसिंगी, ता. नरखेड यांचेवर प्रत्येकी १ असे ०४ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे १) प्रदीप मानिक भोयर, वय ४५ वर्ष, रा. गरदेव मोहल्ला मौदा २) प्रशांत पुरोषत्तम तुमाने, वय ४० वर्ष, रा. गरदेव मोहल्ला मौदा ३) गणेश तुळशीरामजी सोनकुसरे, वय ५० वर्ष, रा. गणेश चौक मौदा ४) किष्णराव रामाजी बारपात्रे, वय ६५ वर्ष, रा. जुनी मच्छीसाद मौदा ५) दत्तात्रय देवराव निपाने, वय २९ वर्ष, रा. वार्ड नं १४, जुनी मच्छीसाद मौदा यांचेवर प्रत्येकी १ असे ०५ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी नामे अल्ताफ चांद शेख, वय ६३ वर्षे, रा. अरोली वार्ड क्र. ०४ याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे १) अरुन किसन वरखडे, वय ६० वर्ष, रा. भटटीटोला, तह. रामटेक २) जय नारायन धुर्वे, वय ५२ वर्ष, रा. देवलापार, तह. रामटेक याचेवर प्रत्येकी १ असे ०२ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे आरोपी नामे १) बाळकृष्ण चंद्रभान नेहारे, वय ३९ वर्ष, रा. सावळी, ता. पारशिवनी, जि.नागपुर २) अशोक गुलाबराव भोंडे, वय ५५ वर्ष, रा. सावनेर, त. सावनेर, ह.मु. पालासावळी, त.पारशिवनी जि.नागपुर ३) कुणाल खेमचंद ठाकुर, वय

२७ वर्ष, रा. मेहंदी ता. पारशिवनी, जि. नागपूर याचेवर प्रत्येकी १ असे ०३ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन पाचगाव** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद

**नमुद कारवाईत एकुण १) ४० लिटर मोहाफुल गावठी दारू २) १४६७० मिली देशी दारू असा एकुण १०९७०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने